# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- gug.registrar@gmail.com  दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४  email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./७२५५/२०२१  दि. १४/१०/२०२१

## महाविद्यालये / शैक्षणिक संस्था सुरु करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे (Standard Operating Procedure)

संदर्भ - या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. गो.वि./आस्था./७२५२/२०२१, दि. १४/१०/२०२१.

कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर महाविद्यालये/वसतिगृहे सुरु करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेसोबत दि. १८/०८/२०२१ रोजी व मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेसोबत दि. २३/०८/२०२१ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीमध्ये महाविद्यालये/वसतिगृहे सुरु करण्याबाबत झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील कोव्हिड परिस्थिती नियंत्रणात असल्याने महाविद्यालये सुरू करण्यास हरकत नाही.

२) महाविद्यालयातील/शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांची होणारी गर्दी टाळण्याच्या उद्‌देशाने प्रत्येक महाविद्यालये /शैक्षणिक संस्थेने वर्ग दोन पाळीमध्ये सुरू राहील व प्रत्येक पाळी ही तीन तासांची राहील याप्रमाणे नियोजन करावे.

३) महाविद्यालये /शैक्षणिक संस्था प्रत्यक्ष सुरू करण्यापुर्वी सर्व महाविद्यालयाने / शैक्षणिक संस्थेने वर्गखोल्याचे तसेच परिसराचे निर्जुंतुकीकरण करणे तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांनी कमीत कमी १ कोविड लसीचे डोज घेतलेला असावा व त्यानंतरच वर्गात प्रवेश देण्यात यावा. जर विद्यार्थ्यांने लसीचे डोस घेतलेले नसेल तर RTPCR चाचणी करुन अहवाल सादर करण्यास कळवावे.

४) प्रत्येक महाविद्यालयातील /शैक्षणिक संस्थेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे लसीकरण होण्याच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून शिबिरांचे आयोजन करण्याबाबत महाविद्यालयांनी /शैक्षणिक संस्थांनी आपल्या स्तरावर कार्यवाही घ्यावी.

५) सद्यस्थितीत निवासी वसतीगृहे विद्यार्थ्यांकरीता खुले करण्यात येवू नये.

६) महाविद्यालयातील/शैक्षणिक संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता दुर्गम भागात एस. टी. महामंडळाची बसेस उपलब्ध न झाल्यास, याबाबत संबंधित मा. जिल्हाधिकारी महोदय, आगार प्रमुख, एस. टी. महामंडळ यांना बसेस उपलब्ध करुन मिळण्याबाबत महाविद्यालयांनी/शैक्षणिक संस्थांनी आपल्या स्तरावर कार्यवाही घ्यावी.

.७) वरील सर्व बाबींचे नियोजन करणे व ते अमलात आणण्याकरीता महाविद्यालय / शैक्षणिक संस्था स्तरावर कृती समिती तयार करून त्या अनुषंगाने कार्यावाही घ्यावी.

८ कोव्हिड—१९ च्या पार्श्वभुमीवर केंद्र शासन, राज्य शासन तसेच स्थानिक प्रशासनाच्या मार्गदर्शक सुचना व निर्देशांचे कोटेकोरपणे पालन करावे.

मा. प्र-कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने,

14.10.2021

**(डॉ. कामाजी देशमुख)**
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली